दिनांक ०६/०२/२०२३

# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक माधव सुधाकर बिराजदार, वय ४० वर्षे, पद– सहायक अभियंता, नेमणुक– महावितरण शाखा, हरंगुळ, ता.जि. लातूर, रा. श्रीनगर, लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक माधव बिराजदार, सहायक अभियंता महावितरण यांनी तक्रारदार यांना व त्यांचे इतर दोन शेतशेजारी यांचा नागझरी गावठाण डी.पी.वरून शेती पंप चालु ठेवण्यासाठी आणि गावठाण डी.पी. चा शेती पंपासाठी विज पुरवठा चालु करण्यासाठी तक्रारदार यांना २५,०००/–रूपये लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. ०६/०२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. ०६/०२/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांना व त्यांचे दोन शेत शेजारी यांचा नागझरी गावठाण डी.पी.वरून शेती पंप चालु ठेवण्यासाठी आणि गावठाण डी.पी. चा शेती पंपासाठी विज पुरवठा चालु करण्यासाठी २५,०००/– रूपयाची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/– रू लाचेची मागणी केल्याचे लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे आज दि. ०६/०२/२०२३ रोजी १४.३२ वा. सुमारास तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक माधव बिराजदार, सहायक अभियंता महावितरण यांनी २५,०००/– रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/– रू. लाचेची रक्कम घेण्याचे मान्य करून लाचेची रक्कम देण्यासाठी ठरलेल्या ठिकाणी निक्की बार जवळ, बार्शी रोड, लातूर जवळ भेटले असता आलोसे लोकसेवक बिराजदार यांनी पंचासमक्ष लाचेची रक्कम १०,०००/– रू स्वत: स्विकारली. त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक माधव बिराजदार, सहायक अभियंता महावितरण यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन एमआयडीसी, लातूर, ता.जि. लातुर, येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयाचा तपास पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोह/रमाकांत चाटे, फारूक दामटे, भागवत कठारे, भिमराव आलूरे, शाम गिरी, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, दिपक कलवले, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, मपोकॉ/रूपाली भोसले, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९६२३९९९९४४ |
| २) | श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९९२३४१७०७६ |
| ३) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ४) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ५) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ६) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ७) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| 8) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर

Scanned with CamScanner